महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई ४०० ००५

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ई-मेल : pmu@mahapocra.gov.in

NDKSP-२२०१९(२१)/१६/२०२५-DBT दि. २८ / १० /२०२५

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (प्रकल्पांतर्गत सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (प्रकल्पांतर्गत सर्व)

विषय : नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत ..

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि. १४/१०/२०२४.
२. शासन निर्णय क्र.कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि. ०८/०७/२०२५.

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागांतर्गत, जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील एकूण २१ जिल्ह्यांमधील ७,२०१ गावे निवडण्यात आली आहेत. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, टप्पा-२ च्या अंमलबजावणीस व जागतिक बँकेसोबत करारनामा करण्यास दिनांक ०८ जुलै २०२५ च्या शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. प्रकल्पाचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना बदलत्या हवामानाशी जुळवून घेण्यासाठी सक्षम करणे व कृषी आधारित उपजीविकेची साधने उपलब्ध करून शेती किफायतशीर करणे हा आहे. बदलत्या हवामानाचा शेतीला कमीत कमी फटका बसेल यासाठी गावनिहाय नियोजन करण्यात येत असून प्रकल्पांतर्गत वैयक्तिक शेतकऱ्यांना हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा अवलंब करणेसाठी विविध घटक राबविण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये नमूद केलेले घटकांच्या अंमलबजावणीसाठीच्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत सहपत्रीत करण्यात येत आहेत.त्यानुसार प्रकल्पांतर्गत गावांमध्ये सदर घटकांची अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उर्वरित वैयक्तिक लाभाच्या घटकांच्या मार्गदर्शक सूचना यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

सोबत : घटकनिहाय मार्गदर्शक सूचना

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प,मुंबई

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव (कृषि), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा २.०

## बांबू लागवड (वैयक्तिक लाभ) मार्गदर्शक सूचना

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदलाविषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहेत. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा दुसरा टप्पा सुरु करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकास प्राधान्य दिले आहे. बांबू हे उत्कृष्ट नुतनीकृत जैवइंधन संसाधन, लाकूड आणि कागद याकरिता उपयुक्त मानले जाते. प्रकल्पांतर्गत बांबू लागवड केल्यास, हवामान बदलास कारणीभूत  ठरणा-या कर्ब वायूंचे स्थिरीकरण करणेबरोबरच बांबू आधारित इतर छोटे उद्योग उभारणी करून शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास हातभार लागेल.

### १. उद्दिष्टे

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावसमुहात वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकाचे उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. वातावरणातील कार्बन उत्सर्जनामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी वृक्ष आच्छादन वाढविणे, जमिनीतील सेंद्रिय घटकांचे संवर्धन, पीक आणि पीक पद्धतीतून उत्पादकता वाढविणे.
२. जमिनीची धूप थांबविणे व जमिनीचा कस वाढविणे.
३. शेतीपिकांना पूरक म्हणून बांबू लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.
४. शेतीपद्धतीवर आधारित बांबू लागवडीखालील क्षेत्रात वाढ करून एकमेकांना पूरक व एकात्मिक पद्धतीने पिकांची उत्पादकता वाढविणे, रोजगाराच्या व उत्पन्नाच्या संधी तसेच ग्रामीण भागातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारणे यासाठी प्रोत्साहन देणे.
५. विविध कृषी पर्यावरणीय प्रदेश आणि जमीन वापराच्या परिस्थितीनुसार बांबूसाठी अनुकूल पद्धती /आदर्श पद्धती लोकप्रिय करणे.
६. शेतीपद्धतीवर आधारित बांबू  लागवड क्षेत्राचा विस्तार व क्षमता बांधणीसाठी सहाय्य करणे.

### २. लाभार्थी पात्रता निकष

२.१. शेतकऱ्यांच्या वैयक्तिक क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड करणे अभिप्रेत आहे. यामध्ये लाभार्थीच्या शेतात, पडीक क्षेत्रात, शेताच्या बांधावर, वैयक्तिक/सामुदायिक शेततळयाच्या बांधावर बांबू लागवडीस प्रोत्साहन दिले जाईल.

२.२. शेतकऱ्याच्या स्वत:च्या नावे ७/१२ उतारा असणे आवश्यक आहे. तथापि, जर लाभार्थी ७/१२ उताऱ्यावर संयुक्तपणे खातेदार असेल तर इतर सर्व खातेदारांचे बांबू लागवडीसाठी सहमतीपत्र बंधनकारक राहील.

२.३. जमीन कुळ कायद्याखाली येत असल्यास, ७/१२ च्या उताऱ्यावर जर कुळाचे नाव असेल तर सदर घटक राबविण्यासाठी कुळाचे सहमतीपत्र आवश्यक राहील.

२.४. सदर घटकाचा लाभ घेण्यासाठी किमान ०.१० हे. ते कमाल एकूण ५ हे. पर्यंत जमीन धारणा असलेले शेतकरी पात्र राहतील.

२.५. निवड झालेल्या लाभार्थ्याने यापूर्वी लागवडीच्या अन्य योजनेंतर्गत (फळबाग/वृक्ष/बांबू इ.) शासकीय अनुदानाचा लाभ घेतला असल्यास, सदर लाभ घेतलेले क्षेत्र ५ हे. या कमाल मर्यादेतून वगळून उर्वरित क्षेत्रासाठी लाभार्थी पात्र राहतील.

## ३. घटकांतर्गत समाविष्ट बाबी व अर्थसहाय्याचे प्रमाण

### ३.१. परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड:

३.१.१. शेतकऱ्यांच्या शेतावरील परिघीय क्षेत्राचा व बांधाचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा, यासाठी परिघीय क्षेत्रावर तसेच बांधावर बांबूची लागवड करता येईल. यामुळे शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी निर्माण करण्यास तसेच बांधबंदिस्तीसाठी व जमिनीची धूप कमी करण्यास मदत होईल. यामध्ये ५ मी. अंतरावर (प्रती हेक्टरी ८० झाडे मर्यादा) लागवडीसाठी प्रती रोप अर्थसहाय्य देण्यात येईल. अनुदानाची परिगणना प्रत्यक्ष लागवड केलेल्या झाडांच्या संख्येनुसार करण्यात येईल.

३.१.२. अर्थसहाय्य:

वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड या घटकांतर्गत परिघीय क्षेत्र/बांधावरील प्रती रोप लागवडीसाठी रक्कम रुपये ३००/- हा आर्थिक मापदंड आहे.

| अ.क्र. | बाब | प्रती रोप अंदाजे खर्च (रु.) |
|---|---|---|
| १ | रोपाची किंमत (वाहतूक खर्चासहित) | ५०.०० |
| २ | खड्डा खोदणे (०.३० x.०.३० x०.३० मी.) | १५.०० |
| ३ | खत टाकून रोप लावणे | १५.०० |
| ४ | निंदनी व डवरणी | ३०.०० |
| ५ | सिंचन करणे | ७०.०० |
| ६ | कुंपण करणे व सुरक्षेचे काम | ६५.०० |
| ७ | खताची किंमत | ५५.०० |
| | **एकूण खर्च** | **३००.००** |

प्रकल्पांतर्गत परिघीय क्षेत्र/बांधावरील बांबू लागवडीकरित बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या १००% टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु. ३००/- प्रती झाड अनुदान देय राहील.

३.२. **सलग लागवड**

३.२.१. शेतकऱ्यांच्या शेतावर मध्यवर्ती ब्लॉक लागवड/पट्ट्यामधील लागवड/ वाऱ्याचा जोर कमी करणाऱ्या रोपांची सलग लागवड करता येईल. उपलब्ध जमिनीचा जास्तीत जास्त वापर होण्याच्या दृष्टीने पीक उत्पादनासाठी अयोग्य व पडीक जमिनीचा उपयोग यामध्ये करता येईल.

३.२.२. यामध्ये प्रति हेक्टर जास्तीत जास्त ४०० रोपे या प्रमाणात वृक्षारोपणासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. सलग लागवड अंतर्गत जास्तीत जास्त ५ हेक्टर क्षेत्रापर्यंत बांबू लागवडीसाठी या योजनेमधून सहपत्रीत केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे (परिशिष्ट - " अ ") प्रोत्साहन दिले जाईल.

३.२.३. सलग लागवड अंतर्गत बांबूचे आर्थीक मापदंड :

| अ.क्र. | सलग लागवड (प्रति हेक्टर कलमे संख्या) | एकूण खर्च रक्कम (रु./हे.) | अनुदान रक्कम (रु./हे) |
|---|---|---|---|
| १ | ४०० ( अंतर ५ x ५ मी.) | १,२०,००० | (१००%) कमाल १,२०,००० |

टिप: प्रत्येक ब्लॉकमधील बांबू वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना वर दर्शविल्यानुसार करण्यात येईल. (संदर्भ: राष्ट्रीय बांबू अभियान मार्गदर्शक सूचना २०२५)

३.३. सदर देय अनुदान दोन वर्षांसाठी विभागून देण्यात येईल. पहिल्या वर्षी देय अनुदानाच्या ६० % व दुसऱ्या वर्षी ४०% या प्रमाणत अनुदान अदा करण्यात येईल.

३.४. लाभार्थ्याने दुसऱ्या वर्षी कमीत कमी ८०% झाडे जिवंत ठेवल्यास दुसऱ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

## ४. घटक अंमलबजावणी कार्यपद्धती

४.१. अर्ज करतेवेळी सर्व्हे नंबर, लागवड करावयाचे क्षेत्र, लागवडीचा प्रकार अचूक निवडणे.

४.२. लागवड अंतराचे परिमाण हे “मीटर” मध्ये देण्यात आलेले आहे.

४.३. प्रकल्पांतर्गत बांबू लागवड वर्षभरात केव्हाही करता येईल.

४.४. समूह सहाय्यक यांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांचे अर्ज पडताळणी करून ग्राम कृषि विकास समितीसमोर मान्यतेस सादर करणे व समितीचा ठराव संकेतस्थळावर अपलोड करणे१ डेस्क) .)

४.५. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रस्तावीत क्षेत्र हे बांबू लागवडीस तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय, याची खात्री करणे. प्रकल्पाच्या DBT app मध्ये आवश्यक माहिती भरणे व भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) सहित फोटो घेऊन ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल सादर करणे. (डेस्क २)

४.६. शेतकऱ्याने अर्ज केलेल्या क्षेत्राचे अंदाजपत्रक तयार करणे व पूर्वसंमती साठी ऑनलाईन अपलोड करणे.

४.७. शेतकरी निहाय अंदाजपत्रकास तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्वसंमती प्रदान करणे (डेस्क ३). सदर पूर्वसंमती हीच या बांबू लागवड घटकासाठी तांत्रिक मंजुरी राहील.

४.८. पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांना बांबू लागवडीबाबत तांत्रिक प्रशिक्षण देण्यात यावे.

४.९. बांबू लागवडीसाठी पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांनी वन विभाग / कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ राष्ट्रीय बांबू बोर्डाने प्राधिकृत केलेल्या रोपवाटिकामधून बांबू रोपे खरेदी करणे.

४.१०. पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर लाभार्थ्याने बांबू लागवड पूर्ण करणे.

४.११. शेतकऱ्याने लागवड पूर्ण झाल्यानंतर रोपे खरेदी व इतर साहित्य खरेदीचे देयके संकेतस्थळावर ऑनलाईन अपलोड करून अनुदान मागणी करणे.

४.१२. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी बांबू लागवडीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, भौगोलिक स्थानांकनासह घेण्यात आलेले फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करणे. (डेस्क ४)

४.१३. अनुदान मागणी प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून शिफारशीत करण्यात आलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करणे.

४.१४. त्यानुसार उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मंजूर मापदंडानुसार देय असलेले अनुदान लाभार्थ्यांना अदा करण्यासाठी मापन पुस्तिका व देयके प्रमाणित करून त्याप्रमाणे डीबीटी प्रणालीमध्ये शिफारस करणे.

४.१५. दुसऱ्या वर्षाचे अनुदान हे लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देय राहील.

४.१६. जर शेतकऱ्यांनी जिवंत झाडांची विहीत प्रमाणातील (मुद्दा क्र. ३.४ प्रमाणे) टक्केवारी राखली नाही तर वसुलीची कार्यवाही करणे.

## ५. अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

### ५.१. लाभार्थी

५.१.१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी प्रकल्पाच्या https://dbt.mahapocra.gov.in वेबसाईटवर नोंदणी पूर्ण झाल्यानंतर DBT App द्वारे online अर्ज करावा.

५.१.२. जर लाभार्थी संयुक्त खातेदार असल्यास, इतर सर्व खातेदारांचे सहमती पत्र घेण्याची जबाबदारी संबधित लाभार्थ्याची राहील. (८-अ चे क्षेत्र ५ हे. च्या आत असावे.)

५.१.३. पुर्वसंमती दिल्यानंतरच शेतकऱ्यांनी वन विभाग/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ राष्ट्रीय बांबू बोर्डाने प्राधिकृत केलेल्या रोपवाटिकामधून बांबू रोपे घ्यावीत.

५.१.४. पूर्वसंमती मिळाल्यानंतरच शेतकऱ्यांनी बांबू लागवडीची कार्यवाही १२० दिवसांमध्ये पूर्ण करावी.

५.१.५. ई-पीक पाहणी ॲपवर सलग बांबू लागवडीची नोदणी करावी.

५.१.६. लागवड पूर्ण झाल्यानंतर रोपे खरेदीची व इतर साहित्याची आवश्यक देयके संकेतस्थळावर अपलोड करून अनुदान मागणी करावी.

५.१.७. प्रकल्पांतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके सहभागी लाभार्थ्याने मान्य करावीत. प्रमाणापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी लाभार्थ्याने स्वतः घ्यावी. त्यासाठी आवश्यक असणारी खड्डे खोदणे, खत मिश्रणाने खड्डे भरणे, रोपांची वाहतूक करणे, त्यांची लागवड करणे, रोपांना कुंपण करणे व वेळोवेळी निंदणी करून पाणी देणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.

५.१.८. दुसऱ्या वर्षाचे अनुदान हे लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच देय राहील. त्या नुसार लाभार्थ्याने अनुदान मागणी करावी. त्याकरिता लाभार्त्याने जिवंत झाडांचे प्रमाण ८०% राखणे बंधनकारक राहील.

## ५.२. ग्राम कृषि विकास समिती (GKVS)

५.२.१. शेतकऱ्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जांची व अनुषंगिक कागदपत्रांची सहाय्यक कृषि अधिकारी/समूह सहाय्यक यांचे मदतीने छाननी करणे.

५.२.२. मार्गदर्शक सूचनांच्या अधीन राहून लाभार्थी निवडीकरिता सहाय्य करणे.

५.२.३. या घटकाचा लाभ अत्यल्प व अल्प भूधारक, अनु. जाती/जमाती, महिला, दिव्यांग संवर्गातील शेतकऱ्यांना प्राधान्याने लाभ देण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत.

५.२.४. बांबू लागवड घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रांना भेट देणे, आवश्यकता असल्यास कृषि विभागाच्या किंवा कृषि विज्ञान केंद्रांच्या तज्ज्ञांना आमंत्रित करणे.

५.२.५. लाभार्थ्यांना त्यांचे अनुभव कथन करण्यासाठी समितीच्या बैठकीस आमंत्रित करणे, जेणेकरून गावातील इतर शेतकरी बांबू लागवडीस प्रवृत्त होतील.

५.२.६. बांबू उत्पादकांचा गट तयार करणे जेणेकरून उत्पादन झालेल्या बांबूची विक्री व्यवस्था बळकट होण्यास तसेच मूल्यवर्धनास मदत होईल.

## ५.३. समूह सहाय्यक

५.३.१. गाव समूहातील इच्छुक लाभार्थ्यांची नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर ( https://dbt.mahapocra.gov.in ) नोंदणी करणे, अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार तांत्रिक सहाय्य करणे .

५.३.२. लाभार्थ्यास बांबू लागवड या घटकाच्या अटी, शर्ती व तांत्रिक/आर्थिक निकष समजावून सांगणे.

५.३.३. ऑनलाईन अर्जाची छाननी करून लाभ घेण्यास पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी करण्याकरिता सहाय्यक कृषि अधिकारी आणि ग्राम कृषि विकास समितीस मदत करणे.

५.३.४. शेतकऱ्यांनी अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे छाननीनंतर, ग्राम कृषि विकास समितीच्या बैठकीचे इतिवृत्त डीबीटी पोर्टलवर अपलोड करणे.

५.३.५. बांबू विषयी तांत्रिक माहिती, हंगामनिहाय सल्ला, हवामानाचा अंदाज, त्यानुसार सल्ला तसेच बाजारभावाबाबत अद्यावत माहिती मिळण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि विभागाचे महाविस्तार AI मोबाईल app डाउनलोड करण्याविषयी प्रवृत्त करणे.

## ५.४. सहाय्यक कृषि अधिकारी

५.४.६. बांबू लागवडीकरिता व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी वेळोवेळी गावस्तरावर होणा-या बैठका/मेळावे/भेटींद्वारे सदर घटकाचा प्रचार व प्रसार करणे.

५.४.७. शेतकऱ्यांचे अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे. लाभार्थ्याने यापूर्वी त्याच क्षेत्रासाठी लाभ घेतला होता किंवा कसे, तसेच अर्जदाराचे ८ अ ची क्षेत्र मर्यादा इ. बाबी तपासणे.

५.४.८. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून प्रस्तावित क्षेत्र हें बांबू लागवडीस तांत्रिक दृष्ट्या योग्य आहे काय, याची खात्री करणे. प्रकल्पाच्या DBT app मध्ये आवश्यक माहिती भरणे व भौगोलिक स्थानांकन (Geo tagging) सहित फोटो घेऊन ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल सादर करणे. ( डेस्क २ )

५.४.९. स्थळ पाहणी झाल्यानंतर योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडानुसार क्षेत्राचे अंदाजपत्रक तयार करावे व पूर्वसंमती साठी तालुका कृषी अधिकारी यांचेकडे ऑनलाईन सबमिट करणे.

५.४.१०. पुर्वसंमती प्राप्त झालेनंतर वन विभाग/ कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ राष्ट्रीय बांबू बोर्डाने प्राधिकृत केलेल्या रोपवाटिकामधून बांबू रोपे घेण्यासाठी शेतकऱ्यांना अवगत करणे.

५.४.११. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी पुर्वसंमती प्राप्त क्षेत्रावरच बांबूची लागवड झाल्याची खात्री करणे.

५.४.१२. लाभार्थ्यांनी पूर्वसंमती प्राप्त नियोजित प्रकल्प क्षेत्रावर रोपे लागवड केल्यानंतर मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे तपासणी करून मोका तपासणी अहवाल देय अनुदानाच्या शिफारशीसह DBT पोर्टलवर अपलोड करणे. (डेस्क ४)

५.४.१३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी बांबू लागवडीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, भौगोलिक स्थानांकनासह घेण्यात आलेले फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करणे. (डेस्क ४)

५.४.१४. वैयक्तिक लाभार्थ्यांच्या अनुदान मागणीसाठी देयके व आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करून संकेतस्थळावर अपलोड करणे. प्रत्यक्ष खर्च जर मापदंडानुसार निश्चित केलेल्या खर्चापेक्षा कमी असेल तर प्रत्यक्ष खर्चा एवढे अनुदान अनुज्ञेय राहील, याची काळजी घ्यावी.

५.४.१५. दरवर्षी जिवंत झाडांची टक्केवारी तपासून लाभार्थ्याने लागवड केलेली रोपांची मोठ्या प्रमाणात मर झालेली आहे किंवा झाडे काढून टाकलेली आहेत, असे निदर्शनास आल्यास, मापन पुस्तीकेमध्ये तसे नमूद करून, तात्काळ अनुदान थांबविण्याकरिता तसेच अदा करण्यात आलेले अनुदान वसूल करण्याकरिता तालुका कृषि अधिकारी यांचेकडे लेखी शिफारस करणे.

५.४.१६. दुसऱ्या वर्षाचे अनुदान हे लागवड केलेल्या दिनांकापासून एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच देय राहील.

५.४.१७. लाभार्थ्याने दुसऱ्या वर्षाचे अनुदान मागणी केल्यानंतर सहाय्यक कृषि अधिकारी यांनी बांबू लागवडीच्या दुसऱ्या वर्षीच्या मापन पुस्तिकेतील नोंदी, घेण्यात आलेले भौगोलिक स्थानांकनासह फोटो व मोका तपासणी अहवाल नोंदवून अपलोड करणे.

५.४.१८. बांबू विषयी तांत्रिक माहिती, हंगामनिहाय सल्ला, हवामानाचा अंदाज, त्यानुसार सल्ला तसेच बाजारभावाबाबत अद्यावत माहिती मिळण्यासाठी शेतकऱ्यांना कृषि विभागाचे महाविस्तार AI मोबाईल app डाउनलोड करण्याविषयी प्रवृत्त करणे.

५.४.१९. बांबू लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**५.५. उप कृषि अधिकारी**

५.५.१. पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करून लाभार्थीच्या स्वाक्षरीसह पोर्टलवर अपलोड करणे.

५.५.२. बांबू उत्पादकांना बांबू विषयी संपूर्ण तांत्रिक माहिती देणे आणि वेळोवेळी सल्ला देणे.

५.५.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी बांबू लागवडीची मापनपुस्तिकेत नोंदविलेल्या नोंदींची खात्री करून प्रमाणित करणे, जर लाभार्थ्याने जिवंत झाडांचे योग्य प्रमाण राखले नसेल तर अनुदान थांबविण्यासाठी तालुका कृषी अधिकारी तसेच उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी कळविणे.

**५.६. मंडळ कृषि अधिकारी**

५.६.१. पर्यवेक्षीय तपासणी अहवाल तयार करून लाभार्थीच्या स्वाक्षरीसह पोर्टलवर अपलोड करणे.

५.६.२. बांबू उत्पादकांना बांबू विषयी संपूर्ण तांत्रिक माहिती देणे आणि वेळोवेळी सल्ला देणे.

५.६.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी नोंदविलेल्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित करणे, जर लाभार्थ्याने जिवंत झाडांचे योग्य प्रमाण राखले नसेल तर अनुदान थांबविण्यासाठी तालुका कृषी अधिकारी तसेच उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी कळविणे.

**५.७. तालुका कृषी अधिकारी**

५.७.१. सहाय्यक कृषि अधिकारी यांनी प्रस्तावित क्षेत्र हे बांबू लागवडीसाठी तंत्रिक दृष्ट्या योग्य असलेबाबत ऑनलाईन स्थळ पाहणी अहवाल, लाभार्थी पात्रतेबाबातचा अभिप्राय व शेतकऱ्याने अर्ज केलेल्या क्षेत्राचे अंदाजपत्रक सादर केल्यानंतर ते तपासून योग्य असल्यास त्यास पोर्टलवरून पूर्वसंमती प्रदान करणे. (डेस्क ३)

५.७.२. शेतकऱ्यांना वेळोवेळी विविध क्षेत्रीय कार्यक्रमांच्या माध्यमातून लागवड करणेकरिता, तसेच दुष्काळसदृशपरिस्थिती मध्ये झाडे जगविणे संदर्भात आवश्यक उपाययोजना करणे बाबत मार्गदर्शन करणे.

५.७.३. शेतकऱ्याने जिवंत झाडांचे प्रमाण राखले नसल्यास अनुदान थांबविण्यासाठी उपविभागीय कृषी अधिकारी यांना लेखी शिफारस करणे.

५.७.४. या अनुषंगाने, शेतकऱ्याने जिवंत झाडांचे प्रमाण राखले नसतानाही, अशा बांबू लागवडीच्या मापन पुस्तिकेमध्ये नोंदी घेऊन अनुदान अदा करण्याकरिता शिफारस केल्याचे आढळून आल्यास, तालुकास्तरीय संबंधित सर्व अधिकारी-कर्मचारी यासाठी जबाबदार राहतील.

५.७.५. तालुक्यातील बांबू लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

**५.८. उपविभाग स्तर (लेखाधिकारी)**

५.८.१. अनुदान मागणी प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर लेखाधिकारी उपविभाग स्तर यांनी अनुदान प्रस्ताव तपासून शिफारशीत करण्यात आलेली रक्कम मार्गदर्शक सुचनेनुसार असल्याची खात्री करणे.

५.८.२. पात्र प्रस्तावांनाची उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे अनुदान अदायगीसाठी शिफारस करणे.

## ५.९. उपविभागीय कृषि अधिकारी

५.९.१. बांबू लागवड करणे संदर्भात व दुष्काळसदृश परिस्थिती मध्ये झाडे जगविणे संदर्भात आवश्यक उपाययोजना करणे बाबत मार्गदर्शन करणे, तसेच अशा उपाययोजनांना व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी वेळोवेळी सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना सूचना देणे.

५.९.२. पूर्वसंमती दिलेल्या शेतकऱ्यांचे सदर घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे.

५.९.३. सहाय्यक कृषि अधिकारी यांचेकडून अनुदान प्रस्ताव व मोका तपासणी अहवाल प्राप्त झाले नंतर लाभार्थींच्या कागदपत्रांच्या बाबतीत कार्यालयातील लेखा अधिकाऱ्यांचे (डेस्क ) मार्फत छानणी झालेनंतर अनुदानाची परीगणना योग्य/अयोग्य असल्याचे खात्री करून शेतकऱ्याचे अनुज्ञेय अनुदान वर्ग करणेसाठी डीबीटी प्रणालीमध्ये नमूद केल्याप्रमाणे जबाबदाऱ्या पूर्ण करणे.

५.९.४. नैसर्गिक आपत्तीसारखी अपवादात्मक परिस्थिती वगळता लाभार्थ्याने जिवंत झाडांचे प्रमाण निकषानुसार राखले नसल्याबाबत अधिनस्त अधिकाऱ्यांनी कळविल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास प्रकल्प कक्षाकडे पुढील अनुदान थांबविण्यासाठी शिफारस करणे व यापूर्वी अदा करण्यात आलेले अनुदान वसूल करणेबाबत कार्यवाही सुरु करणे.

५.९.५. बांबू लागवड घटकाचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रानां भेट देणे. आवश्यकता असल्यास कृषि विभागाच्या किंवा कृषि विज्ञान केंद्रांच्या तज्ञांना आमंत्रित करणे.

५.९.६. बांबू लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ५.१०. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

५.१०.१. जिल्ह्यामधील प्रकल्प गावांमध्ये लाभार्थी निवड, रोपांची उपलब्धता, बांबू लागवड, लागवडीची जोपासना, आपत्कालीन परिस्थितीचे नियोजन इ. सर्व टप्प्यांवर चोख देखरेख ठेवणे.

५.१०.२. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर अनुदान अदायगी पूर्वीची सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.

५.१०.३. बांबू उत्पादकांचा गट तयार करणे जेणेकरून उत्पादन झालेल्या बांबूची विक्री व्यवस्था बळकट होण्यास तसेच मूल्यवर्धनास मदत होईल.

५.१०.४. बांबू लागवड केलेल्या जिल्ह्यांतर्गत गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ५.११. विभागीय कृषि सहसंचालक

५.११.१. वेळोवेळी आढावा घेऊन प्रकल्प गावांमध्ये बांबू लागवडीचे क्षेत्र वाढविणे.

५.११.२. बांबू लागवडीची कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करणे.

५.११.३. बांबू लागवड केलेल्या गावांना भेटी देऊन पर्यवेक्षीय तपासणी करणे.

## ६. संनियंत्रण, मूल्यमापन व लेखापरीक्षण:

राज्य स्तरावरून प्रकल्प व्यवस्थापन कक्षाव्दारे सदर योजनेचे संनियंत्रण करण्यात येईल तसेच, क्षेत्रीय पातळीवर योजनेची अंमलबजावणी करताना विविध स्तरावरील अधिकाऱ्यांनी संनियंत्रण करावे. झालेल्या कामाची तपासणी करण्यासाठी खालीलप्रमाणे विविध स्तरीय अधिका-यांच्या तपासणीचे प्रमाण खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे. सदर तपासणीचे प्रमाण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी लागू राहील. (पर्यवेक्षीय तपासणी अहवाल पहावे.)

**पर्यवेक्षकीय तपासणी**

| अ.क्र. | कार्यालय स्तर | तपासणीचे प्रमाण (प्रस्तावित) |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सहसंचालक | १ लाभार्थी प्रती जिल्हा |
| २ | नोडल अधिकारी, विकृससं कार्यालय | ३ लाभार्थी प्रती जिल्हा |
| ३ | जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | १ लाभार्थी प्रती तालुका |
| ४ | नोडल अधिकारी, जिअकृअ कार्यालय | ३ टक्के लाभार्थी |
| ५ | उपविभागीय कृषी अधिकारी | ३ टक्के लाभार्थी |
| ६ | तालुका कृषी अधिकारी | ५ टक्के लाभार्थी |
| ७ | मंडळ कृषी अधिकारी | १५ टक्के लाभार्थी |
| ८ | उप कृषि अधिकारी | ५० टक्के लाभार्थी |

(परिमल सिंह)
प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,मुंबई

## हमीपत्र
## बांबू लागवड (सलग)

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **"बांबू लागवड घटकांतर्गत सलग लागवड"** या करिता अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. मी अर्ज केलेल्या क्षेत्रासाठी शासनाच्या फळबाग/वृक्ष/बांबू इत्यादी लागवड योजनेमधून सदर क्षेत्रावर लागवडीचा लाभ घेतलेला नाही.

२. सदर योजनेतंर्गत एकूण क्षेत्राप्रमाणे शासनाने प्रतिवर्षी मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च स्वतः करण्यास तयार आहे.

३. योजने अंतर्गत बांबू लागवड झाल्यानंतर त्याची नोंद ७/१२ वर घेण्याची जबाबदारी माझी राहील.

४. बांबू लागवडीनंतर पुढील वर्षी किमान ८० टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. झाडे वरीलप्रमाणे जिवंत राहिली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहिल व यावर झालेला सर्व खर्च व्याजासह मी शासनास परत करण्यास बांधील राहील. तसेच उर्वरीत अनुदान घेण्यास मी पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.

५. बांबू लागवड करिता मिळणारे अनुदान २ टप्प्यात मिळणार असून त्यासाठीचे आवश्यक निकष मला मान्य आहेत.

६. या योजनेच्या अटी व शर्तीनुसार बांबूची लागवड करण्यास मी बांधील असून त्यात कोणतीही कसुर झाल्यास योजने अंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे. तसेच दुष्काळसदृश उद्भवल्यास अशा परिस्थिती मध्येही बांबू लागवड जगवणे माझी जबाबदारी राहील, तसे न झाल्यास मी मिळालेल्या अनुदानाची वसुली करण्यास पात्र असेल, याची मला जाणीव आहे.

७. या योजने अंतर्गत माझ्याकडून कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे.

८. वन विभाग / कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ राष्ट्रीय बांबू बोर्डाने प्राधिकृत केलेल्या रोपवाटीकेवरुन उचल केलेल्या बांबू रोपांची लागवड मी करेन.

९. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

## हमीपत्र
## बांबू लागवड (परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड)

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी **“बांबू लागवड घटकांतर्गत परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड”** या करिता अर्ज करीत आहे. त्यासाठीच्या निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांनूसार विहित अटी व शर्ती मला मान्य असून त्यासाठीचे हमीपत्र सादर करीत आहे.

**मी सत्यप्रतिज्ञेवर प्रमाणित करतो/ करते की,**

१. मी अर्ज केलेल्या क्षेत्रासाठी शासनाच्या फळबाग/वृक्ष/बांबू इत्यादी लागवड योजनेमधून सदर क्षेत्रावर लागवडीचा लाभ घेतलेला नाही.

२. सदर योजनेतंर्गत एकूण क्षेत्राप्रमाणे शासनाने प्रतिवर्षी मंजूर केलेल्या मर्यादेच्या प्रमाणापेक्षा जास्त खर्च झाल्यास तो खर्च स्वतः करण्यास तयार आहे.

३. बांबू लागवडीनंतर पुढील वर्षी किमान ८० टक्के झाडे जिवंत ठेवण्याची जबाबदारी माझी राहील. झाडे वरील प्रमाणे जिवंत राहिली नाही तर त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहिल व यावर झालेला सर्व खर्च व्याजासह मी शासनास परत करण्यास बांधील राहील. तसेच उर्वरीत अनुदान घेण्यास मी पात्र राहणार नाही याची मला जाणीव आहे.

४. बांबू लागवड करिता मिळणारे अनुदान २ टप्प्यात मिळणार असून त्यासाठीचे आवश्यक निकष मला मान्य आहेत.

५. या योजनेच्या अटी व शर्तीनुसार बांबूची लागवड करण्यास मी बांधील असून त्यात कोणतीही कसुर झाल्यास योजने अंतर्गत अनुदानास मी अपात्र राहील याची मला जाणीव आहे. तसेच दुष्काळसदृश उद्भवल्यास अशा परिस्थिती मध्येही बांबू लागवड जगवणे माझी जबाबदारी राहील, तसे न झाल्यास मी मिळालेल्या अनुदानाची वसुली करण्यास पात्र असेल, याची मला जाणीव आहे.

६. या योजने अंतर्गत माझ्याकडून कोणत्याही शासकीय यंत्रणेची फसवणूक झाल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील हे मला ज्ञात आहे.

७. वन विभाग / कृषी संशोधन केंद्र/ कृषी विज्ञान केंद्र/ शासकीय रोपवाटिका/ किसान रोपवाटिका/ राष्ट्रीय बांबू बोर्डाने प्राधिकृत केलेल्या रोपवाटीकेवरुन उचल केलेल्या बांबू रोपांची लागवड मी करेन.

८. मी घोषित करतो / करते की सदर अर्जामध्ये नमूद केलेली सर्व माहिती माझ्या माहिती व विश्वासानुसार सत्य व अचूक आहे.

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

## बांबू लागवड

## सलग लागवड

## मोका तपासणी अहवाल (प्रथम वर्ष)

(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी तपासणी करून भरावे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तपासणी केल्याचा दिनांक | |
| ६ | बाब | **बांबू लागवड (सलग)** |
| ७ | पूर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८ | वाण | |
| ९ | अधिकृत रोपवाटीकेचे नाव, पत्ता | |
| १० | रोपवाटीकेचा नोंदणी क्रमांक | |
| ११ | बांबू लागवड मंजूर असलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र. व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र............,<br>क्षेत्र --------हे |
| १२ | प्रत्यक्ष बांबू लागवड केलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र.व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र............,<br>क्षेत्र --------हे |
| १३ | बांबू लागवडीचा दिनांक | |
| १४ | कलम / रोपांचे वय (महिना/वर्ष) | |
| १५ | दोन ओळींमधील | .................मी. |
| १६ | दोन रोपामधील अंतर | .................मी. |
| १७ | कलमे /रोपे संख्या ( एकूण कलमे/रोपे संख्या नमूद करावी) | |
| १८ | जमिनीचा प्रकार (हलकी/मध्यम/भारी/कातळ/पडीक) | |
| १९ | ओलिताचे इतर साधने (शेततळे, विहीर, लिफ्ट, कॅनॉल व नदी इ.) | |
| २० | लागवड करावयाच्या क्षेत्रावर ठिबक सिंचन संच कार्यान्वित आहे काय? असल्यास संच चालू स्थितीत आहे किवां काय ? | |
| २१ | नव्याने ठिबक सिंचन संचाची जोडणी करून कार्यान्वित केला आहे काय? | होय/नाही |
| २२ | मार्गदर्शक सुचनेतील निकषानुसार बांबू लागवडीमध्ये उणीवा आढळल्यास त्याचा थोडक्यात तपशील- | |
| २३ | अनुदानाची गणना: (खालील बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>अ) बांबू लागवड केलेले क्षेत्र --------हे .<br>ब) कलमे /रोपे संख्या - --------------<br>क) रोपांचा दर प्रती कलम/रोप - रु. --------------- | |

| | |
|---|---|
| | ड) बांबू लागवडीचा एकूण खर्च- रु. ------------<br>इ) तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु ----------- |

बांबू लागवड या घटकांतर्गत बांबू लागवड, मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केली असलेने/नसलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे/प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी /अंगठा** **(स्वाक्षरी) सहाय्यक कृषि अधिकारी**

**(श्री. )** **दिनांकीत स्वाक्षरी करावी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**

**बांबू लागवड**

**परिघीय क्षेत्र / बांधावरील लागवड**

**मोका तपासणी अहवाल (प्रथम वर्ष )**

(सहाय्यक कृषि अधिकारी यांनी तपासणी करून भरावे)

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १ | लाभार्थ्याचे नाव | |
| २ | गावाचे नाव | |
| ३ | तालुका | |
| ४ | जिल्हा | |
| ५ | तपासणी केल्याचा दिनांक | |
| ६ | बाब | **बांबू लागवड (परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड** |
| ७ | पुर्वसंमती क्र.व दिनांक | |
| ८ | वाण | |
| ९ | अधिकृत  रोपवाटीकेचे नाव, पत्ता | |
| १० | रोपवाटीकेचा  नोंदणी क्रमांक | |
| ११ | बांधावर बांबू लागवड मंजूर असलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र. व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………, क्षेत्र --------हे |
| १२ | प्रत्यक्ष बांधावर बांबू लागवड केलेल्या शेताचा सर्व्हे नंबर/गट क्र.व क्षेत्र (हे.) | सर्व्हे नंबर/गट क्र…………, क्षेत्र --------हे |
| १३ | बांबू लागवडीचा दिनांक | |
| १४ | कलम / रोपांचे वय (महिना/वर्ष) | |
| १५ | दोन रोपामधील अंतर | ……………..मी. |
| १६ | कलमे /रोपे संख्या ( एकूण कलमे/रोपे संख्या नमूद करावी) | |
| १७ | जमिनीचा प्रकार (हलकी/मध्यम/भारी/कातळ/पडीक) | |
| १८ | ओलिताचे इतर साधने (शेततळे, विहीर, लिफ्ट, कॅनॉल व नदी इ.) | |
| १९ | मार्गदर्शक सुचनेतील निकषानुसार बांबू लागवडीमध्ये उणीवा आढळल्यास त्याचा थोडक्यात तपशील- | |
| २० | अनुदानाची गणना: (खालील बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>अ) कलमे /रोपे संख्या - --------------<br>ब) रोपांचा दर प्रती कलम/रोप - रु. ---------------<br>क) बांबू लागवडीचा एकूण खर्च- रु. ------------<br>ड) तपासणीनुसार देय होणारी रक्कम- रु ----------- | |

बांबू लागवड या घटकांतर्गत बांबू लागवड, मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण केली असलेने/नसलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे/नाही.

समक्ष-

**लाभार्थ्याचे/प्रतिनिधीचे नाव व स्वाक्षरी /अंगठा** **(स्वाक्षरी) सहाय्यक कृषि अधिकारी**

**(श्री. )** **दिनांकीत स्वाक्षरी करावी**

(टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प**

**बांबू लागवड**

**पर्यवेक्षीय तपासणी अहवाल**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री./श्रीमती | |
| ३. | पदनाम | | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी | १. श्री./श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री./श्रीमती<br>पदनाम | |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | नाव:<br>सर्वे नं.<br>मु.पो. ता उपविभाग | |
| ६. | बाब | वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत -बांबू लागवड | |
| ७ . | लागवडीचे वर्ष | | |
| ८ . | लागवडीचे क्षेत्र (हे. आर.) | | |
| ९ . | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. लागवड केलेली रोपे संख्या ---------------<br>२. जिवंत रोपे संख्या ----------<br>३. ओळींमधील अंतर- मी.<br>४. रोपांमधील अंतर- मी. | |
| १०. | जिवंत रोपे संख्या निर्धारित संख्येपेक्षा कमी आढळल्यास त्याची करणे | १. नैसर्गिक आपत्ती (वादळ/गारपीट/ पूर /दुष्काळ)<br>२. झाडांची निगा न राखल्यामुळे | |
| ११. | अनुदानासाठी शिफारस करण्यात येत आहे काय? | होय/नाही | |
| १२. | लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | | **होय/नाही** |
| १४ | नसल्यास तफावत रक्कम रु. | | |
| १५ | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | | **होय/नाही** |
| १६ | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | | |
| | | | |

| १७ | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय |
|---|---|
| | |

तपासणी अधिकारी,

श्री...................................

पदनाम...................................

(स्वाक्षरी)

इतर अधिकारी

श्री...................................

पदनाम...................................

(स्वाक्षरी)

लाभार्थ्याची/प्रतिनिधीची स्वाक्षरी

(नाव.........................)

परिशिष्ट "अ"-

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
## वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड कार्यक्रम सन २०२५-२६
### परिघीय क्षेत्र /बांधावरील बांबू लागवड आर्थिक मापदंड

रु.३००/- प्रती झाड प्रत्यक्ष खर्च प्रमाणकातील खर्चाच्या बाबी आणि वर्षनिहाय प्रस्तावित खर्चाची वर्गवारी यानुसार प्रस्तावित

झाडे संख्या/हे.- ८० अंतर- ५ मीटर

| अ.क्र. | घटक/बाब | प्रती रोप वर्षनिहाय प्रत्यक्ष खर्चाच्या बाबी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | दुसरे वर्ष | एकूण खर्च |
| १ | रोपांची किंमत (वाहतूक खर्चासहित) | ५० | ० | ५० |
| २ | खड्डे खोदणे (०.३० *०.३० *०.३० मी) | १५ | ० | १५ |
| ३ | खत टाकून रोपे लावणे | १५ | ० | १५ |
| ४ | निंदनी व डवरणी | १५ | १५ | ३० |
| ५ | सिंचन करणे | ४० | ३० | ७० |
| ६ | कुंपण व सुरक्षेचे काम | ५० | १५ | ६५ |
| ७ | खताची किंमत | ३० | २५ | ५५ |
| **एकूण** | | **२१५** | **८५** | **३००** |

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प
## वानिकी आधारित शेतीपद्धती अंतर्गत बांबू लागवड कार्यक्रम सन २०२५-२६

### सलग बांबू लागवड आर्थिक मापदंड

रु.३००/- प्रती झाड प्रत्यक्ष खर्च प्रमाणकातील खर्चाच्या बाबी आणि वर्षनिहाय प्रस्तावित खर्चाची वर्गवारी यानुसार प्रस्तावित

क्षेत्र : १ हे. झाडे संख्या- ४०० अंतर- ५ X ५ मीटर

| अ.क्र. | घटक/बाब | प्रती हेक्टर वर्षनिहाय प्रत्यक्ष खर्चाच्या बाबी | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | दुसरे वर्ष | एकूण खर्च |
| १ | रोपांची किंमत (वाहतूक खर्चासहित ) | २०००० | ० | २०००० |
| २ | खड्डे खोदणे (०.३० *०.३० *०.३० मी) | ६००० | ० | ६००० |
| ३ | खत टाकून रोपे लावणे | ६००० | ० | ६००० |
| ४ | निंदनी व डवरणी | ६००० | ६००० | १२००० |
| ५ | सिंचन करणे | १६००० | १२००० | २८००० |
| ६ | कुंपण व सुरक्षेचे काम | २०००० | ६००० | २६००० |
| ७ | खताची किंमत | १२००० | १०००० | २२००० |
| **एकूण** | | **८६०००** | **३४०००** | **१२००००** |